# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक ३ जून, २०१९/ज्येष्ठ १३, १९४१ (शके)**

**संदर्भ : पत्रक भाग - २ क्रमांक ४९ दिनांकित २७ मे, २०१९**

**मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला सुधारणा :**

५३ . "विधानसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन पत्रक भाग - २ अन्वये मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आगामी पावसाळी अधिवेशनात मंगळवार, दिनांक १८ जून व बुधवार, दिनांक १९ जून, २०१९ रोजी प्रस्तावित करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. तथापि, दिनांक २८ जून, २०१९ रोजी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत सदरहू चर्चा बुधवार, दिनांक १९ जून व गुरुवार, दिनांक २० जून, २०१९ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. तसेच यापुर्वी कळविण्यात आल्यानुसार मा. राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास एका सदस्यास दहापेक्षा अधिक सुधारणा देता येत नाहीत अशी तरतूद म.वि.स. नियम ६१ मध्ये करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सर्व विधानसभा सदस्यांना असे कळविण्यात येते की, **ज्या सदस्यांना आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा द्यावयाच्या असतील त्यांनी सुधारणांच्या सूचना तीन प्रतींमध्ये व सॉफ्ट कॉपीमध्ये (पेन ड्राईव्हमध्ये) 'अ' कक्ष, कक्ष क्रमांक ११०३, (अकरावा मजला), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई - ४०० ०३२ येथे सोमवार, दिनांक १० जून, २०१९ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील या बेताने पाठवाव्यात.**

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **जितेंद्र भोळे** |
| **मुंबई.** | **सचिव (का.)** |
| **दिनांक : ३ जून, २०१९.** | **महाराष्ट्र विधानसभा.** |

**याची प्रत :-**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

****